# <u>प्रेसनोट</u>

**दिनांक ०५/०९/२०१८**

दिनांक ०५/०९/२०१८ रोजी अलंकार पोलीस स्टेशन हद्दीत असणाया ०८ शाळा व महाविद्यालय यांना शिक्षक दिनाचे निमित्ताने भेटी देवून सर्व शाळा व महाविद्यालयाचे शिक्षक, मुख्याध्यापक व प्राचार्य यांना अलंकार पोलीस स्टेशन येथुन नेमण्यात आलेले पोलीस काका पोहवा शेलार, पोहवा देशपांडे, पोहवा पिंजारी, पो. शि. धनवटे यांनी मा. पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडून प्राप्त झालेले शुभेच्छा पत्र मा. सौ. कल्पना जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सॅल्युट करुन व गुलाबाचे फुल देवून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे वेळी शिक्षकांशी सुसंवाद साधुन शिक्षकांचे महत्व काय आहे हे उपस्थित मुलांना सांगण्यात आले. तसेच पोलीस काका ही संकल्पना काय आहे याबद्दलही माहिती देवून संबधीत पोलीस चौकी अधिकारी व पोलीस काका यांचे मोबाईल नंबर देण्यात आले व योग्य मार्गदर्शन करण्यात आले. अशा उपक्रमामुळे सर्व शिक्षक व मुख्याध्यापक हे खुप आनंदी झाले. त्यांनी सांगितले की अशा उपक्रमांमुळे सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांना पोलीसांबद्दल खुपच आदर वाढला आहे. अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात आदरयुक्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

**(सौ. कल्पना जाधव)**
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
अलंकार पोलीस स्टेशन पुणे शहर




ಕನ್ನಡ ಸಂಘ ಪುಣೆ
KANNADA SANGHA,P

